नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ७० Issue - 70 | वार रविवार दि. २७ जुलै २०२५ Blow- Sunday Date 27 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## राज्यातील ७ खासदारांना संसदरत्न पुरस्कार

### १७ पैकी ७ मराठी चेहरे; संसदरत्न पुरस्कारांवर यंदा महाराष्ट्राची मोहोर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : संसदेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खासदारांना दिल्या जाणाऱ्या संसदरत्न पुरस्कारांवर यंदा महाराष्ट्राची मोहोर उमटली आहे. यंदाच्या १७ विजेत्यांतील तब्बल ७ खासदार महाराष्ट्राचेच आहेत. दिल्लीत शनिवारी झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात संसदीय कामकाजमंत्री किरण रिरिजू यांच्या हस्ते अन्य ४ खासदारांनाही विशेष ज्युरी पुरस्कार देण्यात आले. महाराष्ट्रातील हिंदीविरोधावरून चर्चेत आलेले भाजपचे निशिकांत दुबे यांनाही सन्मानित करण्यात आले.

संसदरत्न पुरस्कार २०१० मध्ये सुरू करण्यात आले. पारदर्शकता, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये मजबूत करण्यासाठी संसदेत सक्रिय राहणाऱ्या खासदारांना हे पुरस्कार दिले जातात. संसदेतील सक्रियता, वादविवादात सहभाग, प्रश्न विचारणे आणि कायदेविषयक कामात योगदान या आधारावर दिले जातात. हा पुरस्कार प्राइम पॉइंट फाउंडेशनने सुरू केला आहे. राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्या अध्यक्षतेखालील ज्युरी समितीने २०२५ या वर्षीच्या विजेत्यांची निवड केली.



यंदाच्या विजेत्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अरविंद सावंत, भाजप खासदार मेधा कुलकर्णी, शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के, काँग्रेस खासदार वर्षा गायकवाड, शिवसेनेचे खासदार श्रीरंग अप्पा बारणे आणि भाजप खासदार स्मिता उदय वाघ यांचा समावेश आहे. याशिवाय भाजपचे रवी किशन, प्रवीण पटेल (भाजप), विद्युत बरन महातो (भाजप) आणि दिलीप सैकिया (भाजप) यांचाही विजेत्यांत समावेश आहे.

उत्कृष्ट संसदीय समितीसाठीच्या गटात माहताब यांच्या अध्यक्षतेखालील वित्त स्थायी समिती आणि डॉ. चरणजित सिंग चन्नी यांच्या अध्यक्षतेखालील कृषी स्थायी समिती यांना अहवालांच्या गुणवत्तेसाठी आणि कायदेविषयक देखरेखीतील योगदानासाठी गौरवण्यात आले.

किमान तीन वेळा खासदार म्हणून संसदीय लोकशाहीत सातत्यपूर्ण आणि लक्षणीय योगदान देणाऱ्या चार जणांना विशेष ज्युरी पुरस्कार देण्यात आले. यात सुळे आणि बारणे यांच्यासह ओडिशातील भाजप खासदार भर्तृहरी महताब, केरळातील क्रांतिकारी समाजवादी पक्षाचे वरिष्ठ खासदार एन.के. प्रेमचंद्रन यांचा समावेश आहे.

भाजप खासदार मेधा कुलकर्णी पुरस्कार वितरणानंतर थेट महाराष्ट्र सदनात आल्या आणि त्यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याला नमन करून पुरस्कार महाराजांच्या चरणांशी ठेवला. त्या म्हणाल्या की, हा सन्मान जनतेच्या अपेक्षा संसदेत प्रभावीपणे मांडण्याच्या माझ्यासारख्या खासदारांच्या प्रयत्नांचा गौरव आहे. लोकशाहीत लोकप्रतिनिधीची खरी ओळख त्याच्या कृतिशीलतेत असते. पहिल्यांदाच खासदार झालेले असताना संसदरत्न पुरस्कार मिळणे ही जनतेच्या आशीर्वादाची पावती आहे. मी यापुढेही लोकहितासाठी परखडपणे भूमिका मांडत राहीन, असेही त्यांनी सांगितले.

## राज्यातील अनेक जिल्ह्यांना हाय अलर्ट, पाऊस धो-धो बरसणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यभरात पावसाने जोरदार पुनरागमन केले आहे. अनेक जिल्ह्यांत मुसळधार पाऊस सुरु आहे. ज्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. परंतु अनेक ठिकाणी पावसाच्या संततधारेमुळे जनजीवन आणि वाहतुकीवर मोठा प्रभाव पडला आहे. याच पार्श्वभूमीवर पुढील २४ तास देखील अनेक जिल्ह्यांत अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान विभागाने या जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी केला आहे.

कोकण, दक्षिण मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर आणि विदर्भातील अमरावतीमध्ये वीजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. याठिकाणी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता आहे. परिणामी घाट परिसरातील तसेच नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मुंबई ठाण्यासह कोकण, नाशिकसह उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही भागांत मध्यम ते जोरदार स्वरुपाचा पाऊस बरसण्याची शक्यता आहे. या भागांमध्ये पुढील २४ तासांसाठी ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उर्वरित जिल्ह्यांत हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे, अशा भागांत यलो अलर्ट देण्यात आला आहे.

कोकणात अतिमुसळधार पाऊस बरसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पालघर जिल्ह्याला पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड येथे ऑरेंज अलर्ट असणार आहे. यामुळे बदलत्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर मच्छिमारांनीही मासेमारीसाठी न जाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पश्चिम महाराष्ट्रातही पावसाचा जोर कायम असणार आहे. पुणे आणि सातारा या दोन्ही जिल्ह्यांतील घाट परिसर ऑन अलर्ट असणार आहे. तर कोल्हापूर आणि सांगलीमध्ये देखील मुसळधार पाऊस बसण्याचा अंदाज आहे. विदर्भात चंद्रपूर जिल्ह्यात पावसाची विक्रमी नोंद झाली. आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ५१ टक्के एवढा पाऊस झाला आहे, दरम्यान हवामान खात्याने आणखी दोन दिवस शहर आणि जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर अमरावतीमध्येही वादळी वाऱ्यासह अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे, त्यामुळे येथेही रेड अलर्ट जारी करण्यात आला.

## 'ई-लायब्ररी' चे सरन्यायाधीशांच्या हस्ते लोकार्पण: वकील आणि कायदेक्षेत्राला नवी दिशा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




अमरावती (जिमाका) : अमरावती जिल्हा वकील संघातर्फे आज 'स्व. ड. टी. आर. गिल्डा स्मृती ई-लायब्ररी'चे अमरावती ल्हा व सत्र न्यायालय इमारतीत उद्घाटन सिपना इंजिनिअरींग कॉलेज, बडनेरा रोड येथे करण्यात आले. सरन्यायाधीश, न्या. भूषण गवई यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्या. अतुल चांदुरकर, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती न्या. आलोक आराधे, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती न्या. अनिल किलोर, दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्या. नितीन सांबरे, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ तथा अमरावती जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती न्या. प्रविण पाटील, अमरावतीचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सुधाकर यार्लगड्डा, ज्येष्ठ अधिवक्ता जुगलकिशोर गिल्डा आदी यावेळी उपस्थित होते.


सरन्यायाधीश न्या. गवई म्हणाले, व्यावसायिक विस्तारीकरण झाले आहे. ई -हिअरिंग अशा विविध माध्यमातून नव तंत्रज्ञान आज न्यायदान क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावित आहे. आधुनिक काळात नवीन तंत्रज्ञानाचा वापर न्यायदान क्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे .कायदेशीर अभ्यासाला आणि संशोधनाला गती देण्यासाठी उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक ई-लायब्ररीमुळे वकील तसेच कायदेविषयक अभ्यासकांना डिजिटल माध्यमातून अद्ययावत माहिती उपलब्ध होणार आहे. या ई-लायब्ररीमुळे कायदेशीर संदर्भ, निर्णय आणि लेख त्वरित उपलब्ध होतील, ज्यामुळे वकिलांना खटल्यांची तयारी करणे अधिक सोयीचे होईल. ड. टी. आर. गिल्डा यांच्या स्मृतींना उजाळा देत, त्यांच्या नावाने सुरू झालेली ही ई-लायब्ररी कायदेशीर व्यवसायातील नव्या पायंडा रचेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

न्यायदानाच्या प्रक्रियेत खूप बदल झाले आहे. इंटरनेट सुविधेमुळे कामकाजाचे स्वरूप बदलले आहे. यासाठी ई -लायबरी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. ई-लायब्ररीचा आपल्या कार्यक्षेत्रात उपयोग करून घ्यावा. नवीन पिढीतील वकिलांना याचा निश्चित फायदा होईल. वकिलांनी रोज वाचन करणे आणि ज्ञान अद्ययावत ठेवणे गरजेचे असते. 'वाचाल तर वाचवाल' यानुसार अशीलाला मदत करण्यासाठी पारंपारिक वाचन पद्धतीसोबतच ई -लायबरी निश्चितच मदतनीस ठरेल, असा विश्वास व्यक्त करून सरन्यायाधीश. न्या. गवई यांनी ई-लायब्ररीच्या गरजेवर आणि तिच्यामुळे कायदेक्षेत्रात होणाऱ्या सकारात्मक बदलांबाबत यावेळी समाधान व्यक्त केले. कारगिल दिनानिमित्त त्यांनी शहिदांचे स्मरण करून अभिवादन केले. ज्येष्ठ अधिवक्ता जुगलकिशोर गिल्डा यांनी इ लायब्ररीच्या स्थापनेसाठी देणगी दिली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमरावती जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष ड. सुनील देशमुख यांनी केले. सूत्रसंचलन जिल्हा सरकारी वकील ड. परीक्षित गणोरकर आणि सहायक सरकारी वकील ड. सोनाली क्षीरसागर यांनी केले. आभार अमरावती जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष ड. लांडे यांनी मानले. कार्यक्रमानंतर सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांचे अमरावती विमानतळ येथून प्रस्थान झाले. यावेळी आमदार रवी राणा, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सौम्या शर्मा आदी उपस्थित होते.

### मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली वस्त्रोद्योग विभागाची आढावा बैठक

## वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरासाठी समिती स्थापन करावी : मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : सामाजिक न्याय, आदिवासी विकास आणि इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या नवीन सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत एकसमान निकष ठरवावे. या विभागांतर्गत असणाऱ्या सूतगिरण्यांसाठी त्या त्या विभागाने अतिरिक्त तरतूद करून द्यावी. तसेच वस्त्रोद्योग क्षेत्रामध्ये सौर ऊर्जेच्या वापरामध्ये येत असलेल्या अडचणी सोडवण्यासाठी वस्त्रोद्योग आणि ऊर्जा विभागाची समिती स्थापन करण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वस्त्रोद्योग विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, विधान परिषदेचे आमदार अमरीश पटेल, वित्त विभागाचे अप्पर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अंशु सिन्हा, वस्त्रोद्योग आयुक्त संजय दैने, रेशीम संचालनालयाचे संचालक विनय मुन, उपसचिव श्री.पवार, उपसचिव श्रीमती कोचरेकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, सहकारी सूतगिरण्यांना प्रति चाती रुपये पाच हजार प्रमाणे द्यावयाच्या कर्जावरील व्याज अनुदान योजनेस मुदतवाढ देताना यामध्ये आधुनिकीकरण आणि श्रेणीकरण करण्यात यावी. राज्यामधील राष्ट्रीय वस्त्र महामंडळाच्या अंतर्गत बंद असलेल्या मिल पुन्हा सुरू करण्याबाबत अहवाल तयार करावा. त्या आधारे बंद मिल पुन्हा सुरू करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण २०२३-२८ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यात याव्यात. याचबरोबर सहकारी सूतगिरण्या व सहकारी यंत्रमाग संस्थाकडील शासकीय देणी वसुलीबाबत धोरण तयार करण्यात यावे. याचबरोबर राज्यातील सर्व यंत्रमागाच्या नोंदी करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. पुणे येथील रेशीम संचालनालयाच्या वापरात असलेली इमारत दुरुस्ती व इतर सोयी सुविधा निर्माण करण्याकरिता महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेण्याची कार्यवाही तत्काळ पूर्ण करावी, अशा सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या. नवीन महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग विकास महामंडळ निर्माण करणे, वस्त्रोद्योग आयुक्तालय आणि रेशीम संचालनालयाचे विलीनीकरण करून वस्त्रोद्योग व रेशीम आयुक्तालयाची निर्मिती करणे, सहकारी सूतगिरण्यांकडील अतिरिक्त जमीन विक्रीस परवानगी देण्याबाबतची योजना, सूतगिरण्यांना पुनर्वसन कर्ज देण्यासाठी नवीन योजना तसेच सूतगिरण्या भाडेपट्टीवर देण्यासाठी योजना तयार करणे, सहकारी सूतगिरणी यांची प्रकल्प अहवाल किंमत रुपये ८०.९० कोटी वरून रुपये ११८ कोटी इतकी सुधारित करण्याबाबतची कार्यवाही करणे, सातारा जिल्ह्यातील वाई येथील रेड क्रॉस सोसायटी यांच्याकडील लिजवरील जागा जिल्हा रेशीम कार्यालयाकरिता कायमस्वरूपी घेणे आदी महत्त्वपूर्ण विषयांचा आढावा यावेळी घेण्यात आला.

### ९ सप्टेंबरपासून आशिय कप स्पर्धेस प्रारंभ

### १४ सप्टेंबर रोजी भारत-पाक सामना होणार युएईमध्ये

## आशिया कपमध्ये भिडणार भारत-पाकिस्तान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : काही दिवसांच्या प्रतीक्षेनंतर आणि अनेक चर्चांनंतर अखेर आशिया कप २०२५ चं संपूर्ण वेळापत्रक समोर आलं आहे. आशियाई क्रिकेट परिषदेनं शनिवारी, २६ जुलै रोजी या ८ संघांच्या स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं. आशिया कपची सुरुवात ९ सप्टेंबरपासून होणार असून अंतिम सामना २८ सप्टेंबरला रंगणार आहे. ही संपूर्ण स्पर्धा बीसीसीआयच्या यजमानपदाखाली संयुक्त अरब अमिराती (णए)मध्ये आयोजित होणार आहे. टी-२० वर्ल्ड कप २०२६ च्या पार्श्वभूमीवर यंदा आशिया कप टी-२० फॉर्मॅटमध्ये खेळवला जाणार आहे. यामध्ये अंतिम सामन्यासह एकूण १८ सामने खेळवले जातील.

या वर्षी ८ संघांमध्ये स्पर्धा होणार आहे आणि त्यानुसार २ गट तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक संघ गटातील उर्वरित तिन्ही संघांविरुद्ध एक-एक सामना खेळेल. त्यानंतर प्रत्येक गटातील टॉप २ संघ सुपर-४ राऊंडमध्ये प्रवेश करतील. तिथं प्रत्येक संघ बाकी ३ संघांविरुद्ध एक सामना खेळेल. या फेरीत टॉप २ संघ अंतिम फेरीसाठी पात्र ठरतील.

ग्रुप : भारत, पाकिस्तान, यूएई आणि ओमान

ग्रुप इ : श्रीलंका, बांगलादेश, अफगाणिस्तान आणि हाँगकाँग

आशिया कप २०२५ - संपूर्ण वेळापत्रक (ग्रुप स्टेज)

९ सप्टेंबर - अफगाणिस्तान विरुद्ध हाँगकाँग

१० सप्टेंबर - भारत विरुद्ध यूएई

११ सप्टेंबर - बांगलादेश विरुद्ध हाँगकाँग

१२ सप्टेंबर - पाकिस्तान विरुद्ध ओमान

१३ सप्टेंबर - बांगलादेश विरुद्ध श्रीलंका

१४ सप्टेंबर - भारत विरुद्ध पाकिस्तान

१५ सप्टेंबर - यूएई विरुद्ध ओमान

१५ सप्टेंबर - श्रीलंका विरुद्ध हाँगकाँग

१६ सप्टेंबर - बांगलादेश विरुद्ध अफगाणिस्तान

१७ सप्टेंबर - पाकिस्तान विरुद्ध यूएई

१८ सप्टेंबर - श्रीलंका विरुद्ध अफगाणिस्तान

१९ सप्टेंबर - भारत विरुद्ध ओमान

सुपर-४ आणि अंतिम सामना

२० सप्टेंबर - बी१ विरुद्ध बी२

२१ सप्टेंबर - ए१ विरुद्ध ए२

२३ सप्टेंबर - ए२ विरुद्ध बी१

२४ सप्टेंबर - ए१ विरुद्ध बी२

२५ सप्टेंबर - ए२ विरुद्ध बी२

२६ सप्टेंबर - ए१ विरुद्ध बी१

२८ सप्टेंबर - अंतिम सामना

आशिया कपमध्ये भारताचे सामने

आशिया कप २०२५ मध्ये, भारतीय संघ युएई विरुद्ध पहिला सामना खेळेल. दुसरा सामना पाकिस्तान विरुद्ध आणि टीम इंडियाचा गट टप्प्यातील शेवटचा सामना ओमान विरुद्ध असणार आहे. भारत हा आशिया कपचा गतविजेता आहे, ज्याने २०२३ च्या अंतिम सामन्यात श्रीलंकेचा १० गडी राखून पराभव केला होता.

१० सप्टेंबर - भारत विरुद्ध यूएई

१४ सप्टेंबर - भारत विरुद्ध पाकिस्तान

१९ सप्टेंबर - भारत विरुद्ध ओमान

# मिरजच्या भूमीतून झळकलेला तेजस्वी दीपस्तंभ – सिद्धार्थ भोकरे

## एकाच व्यक्तीत क्रीडा, लेखन, नेतृत्व आणि संवेदनशील समाजभान – सिद्धार्थ भोकरे यांचा बहुआयामी प्रवास!

शब्दांची धार, समाजाचा आधार – सिद्धार्थ भोकरे यांचा वाढदिवस प्रेरणादायी कार्याच्या आठवणींसह साजरा!

सिद्धार्थ भोकरे: एक युवा ऊर्जा, बहुआयामी व्यक्तिमत्व आणि समाज-सेवेचा दीपस्तंभ!

२७ जुलै हा दिवस केवळ एका व्यक्तीचा वाढदिवस नाही, तर तो आहे पत्रकारिता, शिक्षण, क्रीडा आणि सम ाजसेवा यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या एका युवा नेतृत्वाचा उत्सव. मा. श्री. सिद्धार्थ भोकरे यांचा वाढदिवस. त्यांच्या या विशेष दिनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे, जो त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची आणि जनमानसात त्यांनी मिळवलेल्या स्थानाची ग्वाही देतो.

मा. सिद्धार्थ भोकरे हे नाव महाराष्ट्राच्या सामाजिक आणि व्यावसायिक वर्तुळात आता अपरिचित राहिलेले नाही. संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स (SBGI), मिरज चे कार्यकारी संचालक म्हणून ते शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देत आ-हेत. याव्यतिरिक्त, 'दैनिक महानगरी' आणि 'दैनिक जनप्रवास' यांसारख्या प्रतिष्ठित दैनिकांचे ते मालक आ-हेत, जिथे त्यांच्या दूरदृष्टीचा आणि निर्भीड पत्रकारितेचा प्रत्यय येतो. मिरज-सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही ते सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा जपण्याचे काम करतात. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संघटक आणि समाजसेवेत अग्रेसर असणारे मा. श्री. संजय भोकरे यांचे सुपुत्र असल्याने, सम ाजसेवेचे बाळकडू त्यांना घरातूनच मिळाले आहे.



**पत्रकारिता: सत्य आणि निर्भीडपणाचा अविष्कार**

सिद्धार्थ भोकरे यांची खरी आ-ळख म्हणजे त्यांची पत्रकारिता. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे डिजिटल मीडिया राज्य अध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागांतील पत्रकारांना शासनाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. पत्रकारांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी त्यांनी शासन स्तरावर अथक पाठपुरावा केला असून, अनेक महत्त्वपूर्ण प्रश्न मार्गी लावले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पत्रकार संरक्षण कायदा लागू करण्याबाबत आंदोलने झाली, पत्रकारांवरील हल्ल्यांना तातडीने वाचा फोडणारी संघटना म्हणून संघ म जबूत झाला, आणि नव्या पत्रकारांना दिशा देणारे कार्यशिबिर, कार्यशाळा, संवाद अधिवेशने आयोजित करण्यात आली.

पत्रकार हा फक्त बातमीचा वाहक नसतो, तो समाजाचा आरसा असतो, या विश्वासावर त्यांची वाटचाल सुरू आहे. अनेकदा सत्तेच्या विरोधात उभे राहूनही सत्य मांडण्याचे धाडस त्यांनी दाखवले आहे. २०१९ साली त्यांनी लिहिलेल्या एका वादग्रस्त लेखा-ने त्यांना जीवे मारण्याच्या धमक्या आल्या, पण त्यांनी शब्दांची तल-वार म्यान केली नाही. उलट, त्या लेखाच्या समर्थनात उभे राहत त्यांनी सांगितले – माझ्या शब्दांमागे समाजाचं भलं आहे; मग त्यासाठी जोखीमही स्विकारली पाहिजे. या घटनेने त्यांना केवळ एक पत्रकार म्हणून नव्हे, तर अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या झुंजार रक्षक म्हणून एक व्यापक ओळख मिळवून दिली.

**शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील योगदान:**

शिक्षण क्षेत्रात, संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे उपाध्यक्ष म्हणून सिद्धार्थ भोकरे शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि विविध सामाजिक व शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी सक्रिय आहेत. युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ते सदैव प्रयत्नशील असतात.

क्रीडा क्षेत्रातही त्यांनी आपला वेगळा ठसा उमटवला आहे. महाराष्ट्र फुटबॉल संघाचे उपकर्णधार म्हणून त्यांनी आपल्या संघाचे यशस्वीपणे नेतृत्व केले आहे. खेळाडू म्हणून असलेले त्यांचे कौशल्य आणि नेतृत्वाची क्षमता वाखाणण्याजोगी आहे.

**कला आणि मनोरंजन क्षेत्रातील सक्रियता:**

लहानपणापासूनच सिद्धार्थ भोकरे यांना कला क्षेत्राची आवड आहे. त्यांनी अनेक लघुपटांमध्ये अभिनय केला आहे. 'सिद्धार्थ भोकरे फिल्म्स' या स्वतःच्या प्रॉडक्शन हाऊसच्या माध्यमातून ते हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतही सक्रिय आहेत. त्यांचे इन्स्टाग्रामवर लाखो फॉलोअर्स आहेत, जिथे ते आपल्या अभिनयाची आणि क्रीडा कारकिर्दीची झलक दाखवतात. बॉलिवूड आणि मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक कलाकारांसोबत ते नेहमीच दिसतात, जे त्यांच्या कला क्षेत्रातील सक्रियतेची साक्ष देतात.

**राजकीय संपर्क आणि समाजसेवेची धुरा:**





सिद्धार्थ भोकरे यांचा राजकीय संपर्क खूप चांगला आहे. आद-रणीय शरद पवार साहेबांपासून ते देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत दादा पाटील, उद्धव ठाकरे, संजय राऊत अशा अनेक मोठ्या राजकीय नेत्यांशी त्यांचे सलोख्याचे संबंध आहेत. हा संपर्क ते समाजकार्यासाठी वापरतात आणि गरजूंना मदत करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतात.

सामाजिक बांधिलकी जप-ताना, सिद्धार्थ भोकरे यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त आज पर्यंत म हाराष्ट्रात विविध समाजोपयोगी उपक्रम राबवले आहेत. यामध्ये गरीब आणि गरजू कुटुंबांना किराणा वाटप, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक वस्तूंचे वाटप, आणि वर्षभर शैक्षणिक साहित्याचे वाटप असे अनेक उपक्रम राबवले जातात. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकाराने हे उपक्रम वर्षभर सुरू असतात. शेती संकट, महिलांचे हक्क, आदिवासींच्या समस्या, शिक्षणातील असमतोल, आणि आरोग्यविषयक धोरणे यावर त्यांनी अभ्यासपूर्ण आणि धडाडीची मांडणी केली आहे. त्यांचे अनेक लेख ग्रामीण भागात जनजागृतीसाठी वापरले गेले आणि त्यामुळे अनेक ठिकाणी प्रश्न सोडवले गेले. यामुळे ते आज केवळ एक पत्रकार नसून, जनतेचा आवाज बनले आहेत.

आपल्या वडिलांप्रमाणेच सिद्धार्थ भोकरे यांनाही इतरांना मदत करण्याचा स्वभाव आहे. पत्रकार बंधूंवर कोणतेही संकट आले, तर ते कधीही धावून जातात. पत्रकारितेतील त्यांच्या या कार्यामुळे त्यांना अनेकदा धमक्यांना सामोरे जावे लागले, परंतु त्यांनी कधीही डगमगून न जाता आत्म विश्वासाने परिस्थितीला तोंड दिले.

सिद्धार्थ भोकरे हे केवळ वर्तम ानपत्रात छापले जाणारे नाव नाही, तर ते आहे पत्रकारितेचं एक मूल्य, एक विचारधारा, एक चळवळ. त्यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, आणि विचारवंत एकत्रितपणे त्यांचं योगदान स्मरण करत आहेत.


सिद्धार्थ भोकरे सरांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

आपणास आरोग्य, यश, आणि अजून तेजस्वी लेखनाच्या असंख्य संधी मिळोत. तुमच्या लेखणीचा प्रकाश समाजाच्या अंध:कारात दीपस्तंभ ठरो.

या वाढदिवसाबद्दल त्यांना म हाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, संघटनेतील सर्व पत्रकार बांधव तसेच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून हार्दिक शुभेच्छा!

**लेखन: डॉ. विश्वासराव आरोटे**
**कळसुबाई शिखरावरून**

# जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राज्याचे जलसंपदा (विदर्भ तापी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे सपत्नीक दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने लेखाधिकारी तथा प्र.व्यवस्थापक मुकेश अनेचा यांच्या हस्ते जलसंपदा मंत्री श्री महाजन यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी मंदिर समितीचे कर्मचारी तसेच मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

तत्पूर्वी जलसंपदामंत्री श्री. महाजन यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून माहिती घेतली. यावेळी लेखाधिकारी तथा प्र.व्यवस्थापक मुकेश अनेचा यांनी मंदिर संवर्धन विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली.

# राज्यपालांची राजभवन येथील कर्करोग जनजागृती शिबिराला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राजभवन येथे अधिकारी, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी आयोजित कर्करोग जनजागृती शिबिराला भेट देऊन तपासणी आणि जनजागृती उपक्रमाची माहिती घेतली.



महिलांनी व मुलींनी कर्करोगासंदर्भातील पूर्व चाचणी नियमितपणे करून घ्यावी. तसेच, कर्करोगाविषयी जनजागृतीसाठी अशा शिबिरांचे आयोजन सातत्याने करण्यात यावे. पूर्व तपासणीतून रोग लवकर लक्षात आल्यास वेळेवर निदान व उपचार शक्य होतात. त्यामुळे अधिकाधिक लोकांनी अशा शिबिरांमध्ये सहभागी होऊन चाचणी करून घ्यावी, असे आ-वाहन राज्यपालांनी यावेळी केले.

राजभवन, मुंबई डिस्पेंसरी आणि कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्करोग जनजागृती शिबिर व व्याख्यानाचे आयोजन राजभवन क्लब येथे करण्यात आले.

कर्करोग पूर्व निदानासाठी मोफत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातही ९ ते ४५ वयोगटातील म ुली आणि महिलांसाठी गर्भाशयाच्या कर्करोग प्रतिबंधक लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली.

उइउ, मॅमोग्राफी, पॅप स्मिअर, क्ष्झत टेस्ट, एछढ तप-ासणी आणि प्रोस्टेट (झड) टेस्ट यांचा समावेश होता. एकूण ११० व्यक्तिंना ह्यूमन पॅपिलोमाव्हायरस (एचपीव्ही) प्रतिबंधक लस देण्यात आली.

तपासणी शिबीराचा १७१ कर्मचाऱ्यांनी लाभ घेतला.

यावेळी आरोग्य तपासणी कार्यक्रमात कॅन्सर पेशंट एड असोसिएशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. अलका सप्रू बिसेन; कॅन्सर स्क्रिनिंग सेवा विभागाच्या कार्यकारी संचालिका सौ. नीता मोरे ; स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. तृप्ती पोयरेकर; तसेच जनरल सर्जन डॉ. सत्येंद्र मेहरा यांनी त्यांच्या तज्ज्ञ टीम व कॅन्सर पेशंट्स एड असोसिएशनचे पदाधिकारी व राजभवन दवाखान्यातील डॉक्टर, कर्मचारी, उपस्थित होते.




# निफाड सायकलिष्टचे वतीने शहिदांना मानवंदना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

निफाड सायकलिस्ट निफाड यांचे वतीने कारगिल विजय दिनानिमित्त लढ्यातील शहीद जवान व या काम गिरीत सहभागी जवान यांना सायकल राईड करत मानवंदना देण्यात आली. सहभागी रायडर्स सकाळी ६ ते ७.३० वेळेत विविध ठिकाणी राईड करून शहीद स्मारक , पंचायत समिती कार्यालय, निफाड येथे उपस्थित होते. यावेळी जय जवान जय किसान, शहीद जवान अमर रहे, व्यर्थ न हो बलिदान अश्या घोषणा देण्यात आल्या. राईड दरम्यान झाडे लावा झाडे जगवा, सायकल चालवा पर्यावरण वाचवा, मेरी बेटी मेरा अभिमान, बेटी बचाव बेटी पढाव इ पोस्टर्स द्वारे जनजागृती करण्यात आली. याप्रसंगी , अश-ोक कोल्हे, संदीप गवळी, राजाभाऊ गवळे, अथर्व नकाते, प्रविण तनपुरे यांनी सहभाग नोंदवला होता

# मुंबई – पुणे एक्सप्रेसवे वरील वाहतूक सुरळीत सुरू

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची माहिती

मुंबई : यशवंतराव चव्हाण मुंबई पुणे एक्सप्रेस मार्गावरील मुंबईकडे येणाऱ्या लेनमध्ये मातीचा मलबा ढासळल्याने दि. २५ रोजी सायंकाळी काही काळ वाह-तूक बंद झाली होती. याबाबत तात्काळ कार्यवाही करून महामार्गावरील या दोन्ही लेनमधील वरील वाहतूक पूर्ववत सुरळीत सुरू आहे असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास म हामंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

एक्सप्रेस वे वर ४५/३०० किमी अंतरावर सायंकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी मुंबईकडे येणाऱ्या लेनमध्ये रस्त्यावर झाडाच्या फांद्या व काही मातीचा मलबा ढासळला होता. काही काळ वाहतूक बंद झाल्याने त्याबाबत माध्यमातून वृत्त आले होते. एमपीईडब्ल्यू पॉईंट येथे तैनात असलेल्या पथकाने जेसीबी व यंत्रणेच्या सहाय्याने पावणे सात वाजता ते पूर्णपणे दूर करण्यात आले. महामार्गावरील या दोन्ही लेनमधील वरील वाहतूक पूर्ववत सुरळीत सुरू करण्यात आली. तोपर्यंत एक लेन मोकळी करण्यात आली. त्यानंतर १८:४४ वाजता सर्व लेन मोकळी करण्यात आल्या आणि १८:४५ पर्यंत वाह-तूक पूर्णपणे मोकळी झाली. एक्सप्रेसवेची वाहतूक स्थिती सामान्य आहे आणि सर्व लेनमधील सर्व वाहनांसाठी खुली आहे, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने कळविण्यात आले आहे.

# सुमीत रामकिसन खंडारे यांना भाऊ फाउंडेशन पँथर्सच्या वतीने राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा /प्रतिनिधी : भाऊ फाऊंडेशन पँथर्स महाराष्ट्र राज्य व शाकतोकान कराटे व क्रीडा मंडळ जालना, यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय पुरस्कार २०२५ यांच्या राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा चे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी त्यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या लोकांना मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.



यामध्ये नुकतेच पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणारे तसेच सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारे कामगार नेते, सामाजिक कार्यकर्ते ,पत्रकार सुमीत रामकिसन खंडारे यांची राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. असे पत्र या कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भाऊ फाउंडेशन पँथर्स महाराष्ट्र राज्य यांनी दिले आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत, त्यांची निवड राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कारसाठी करण्यात आली आहे.

जालना येथे होणाऱ्या या भव्य दिव्य कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या या निवडून मुळे विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदन व कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# श्री स्वामी समर्थ शासकीय आयटीआय अक्कलकोट येथे विजय दिन संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे विजय दिवस मातृभूमीच्या रक्षणाचा गौरवशाली इतिहासातील स्मरणार्थ संपन्न झाला सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेतील शिल्प निदेशक श्री दिनेश मंठाळे यांनी केले त्यानंतर दोन मिनिट स्तब्धता पाळून शूरवीर यांना आदरांजली वाहण्यात आली.

शूरवीर यांचे प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आली सदर कार्यक्रमामध्ये प्राध्यापक माननीय अभिजीत लोके सर यांचे स्वागत संस्थेचे जेष्ठ निदेशक श्री एमजी नदाफ यांनी केले व संस्थेत देशसेवा केलेले माजी सैनिक लो-डेमेजर यांचा सत्कार करण्यात आला त्यानंतर प्रशिक्षणार्थी नी आपल्या म नोगतामध्ये शूरवीरांची गाथा सांगितली त्यांची आठवण करून दिली. प्राध्यापक अभिजीत लोके सर यांनी आपल्या व्याख्यान मध्ये देश सेवा करणारे सैनिकांचे कार्य सेवा समजावून सांगितली व अखंड देशाकरिता अनेक शूरवीर शहीद झाले आपल्या देशावर परकीयांचे आक्रमण अनेक वेळा झाले असता त्या आक्रमणांना विरोध करून अनेक ऐतिहासिक लढाया जिंकून देशाचे संरक्षण शूरवीर यांनी केले.

या सर्व गोष्टींची स्मरण प्रशिक्षणार्थी ना करून दिली. विजय दिवस साजरे करण्याकरिता संस्थेतील ज्येष्ठ निदेशक




एम जी नदाफ शिल्प निदेशक श्री दिनेश मंठाळेश्री बिराजदार सर सौ गवल मॅडम त्याचप्रमाणे सर्व प्रशिक्षणार्थी यांचे परिश्रम लाभले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# सहकाराच्या माध्यमातून अर्थव्यवस्थेला चालना देण्याचे शासनाचे धोरण : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

## स्वाभिमानी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सचिव संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी : २०४७ पर्यंत विकसित भारताच्या स्वप्नपूर्तीमध्ये सहकार चळवळीचे योगदान महत्त्वाचे राहणार आहे. सेवा सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीस बळकटी देऊन ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देणे व सहकारातून रोजगारनिर्मिती करणे हे केंद्र शासनाचे धोरण आहे, असे प्रतिपादन जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.




अकोले येथे स्वाभिमानी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या सचिव संघटनेच्या राज्यस्तरीय अधिवेशनाचे उद्घाटन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. आमदार डॉ. किरण लहामटे, आमदार अमोल खताळ, आमदार सत्यजित तांबे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष माधवराव कानवडे, सचिव संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे, सहकारी संस्थांचे प्रतिनिधी व राज्यभरातून आलेले सचिव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, सेवा सहकारी संस्थांच्या समस्या यापूर्वी गांभीर्याने घेतल्या गेल्या नव्हत्या. मात्र स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन झाल्यापासून सहकार चळवळीला भक्कम पाठबळ मिळाले आहे. केंद्र शासनाने जाहीर केलेले राष्ट्रीय सहकार धोरण यशस्वी करण्यासाठी सहकार चळवळ बळकट करावी. राज्य शासन सचिवांच्या पाठीशी ठामपणे उभे असून त्यांना सर्वतोपरी पाठबळ देईल. सेवा सहकारी संस्थांचा इतिहास गौरवशाली असून ज्या उद्दिष्टांनी या संस्था सुरू झाल्या, ती पूर्णत्वास जाऊ शकलेली नाहीत. आव्हानात्मक परिस्थितीत संस्थांचा कारभार सुरू आहे. त्यामुळे संस्थांना उत्पन्नाचे पर्याय उपलब्ध करून देण्याची दिशा केंद्र सरकारने घेतली आहे. मार्गदर्शक सूचनांच्या आधारे संस्था आपला व्यवसाय सुरू करू शकतात.

सोसायट्यांचे मानांकन करून त्यांच्यासाठी दर्जानुसार बँकिंग प्रणालीशी जोडणी करण्यात आली तर संस्थांना व्यवसायाची साखळी निर्माण होईल. सहकार चळवळीच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ही सुरुवात असून सहकार बळकट करण्यासाठी शासन आपले पाठबळ देईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

राज्यमंत्री श्री.भोयर म्हणाले, सहकार मंत्रालयाने घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयांमुळे सहकार चळवळीला मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यातील काही भागांमध्ये सहकार क्षेत्रात चांगले कार्य झाले असले तरी विदर्भात मात्र सहकाराची स्थिती नाजूक आहे. सचिव आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांची जबाबदारी शासन घेणार असून लवकरच मंत्रालयात यासंदर्भात विशेष बैठक घेण्यात येईल. त्रिस्तरीय सहकारी रचनेमध्ये सोसायट्यांना नव्या सहकार धोरणात प्राधान्य देण्यात आले आहे.

आमदार सत्यजित तांबे यांनी संगमनेर व अकोले तालुक्यांतील सहकार चळवळीचा आढावा घेत सचिवांच्या मागण्यांसाठी केलेल्या पाठपुराव्याची माहिती दिली. आमदार डॉ. किरण लहामटे यांनी राज्य शासन सचिवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगून समस्या निश्चितपणे मार्गी लागतील, असा विश्वास व्यक्त केला. सचिव संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे यांनी अधिवेशनाच्या प्रारंभी सचिवांच्या विविध मागण्यांचे प्रास्ताविकात सविस्तर विवेचन केले.






## कारगिल विजय दिवस साजरा केला सैनिक टाकळीतील तरुणांनी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सैनिक टाकळी तालुका/संजय चव्हाण : शिरोळ, जिल्हा:- कोल्हापूर येथील युवकांनी कारगिल दिवस साजरा केला. कारगिल युद्धातील शूरवीर शहीद जवानांना आदरांजली वाहण्यासाठी सैनिक टाकळीतील तरुण कारगिल मध्ये जाऊन कारगिल विजय दिवस साजरा केला. त्यावेळी अमर पाटील, मधुकर पाटील, संतोष गायकवाड,गोविंद पाटील, सुनील कोष्टी, मनोज सावंत यांनी सैनिकांना आदरांजली वाहिली. सैनिकी परंपरा असलेल्या सैनिक टाकळीतील तरुणांना भारत भूमीच्या रक्षणासाठी सदैव तैनात असणाऱ्या सैनिकांविषयी सदैव त्यांच्याविषयी अभिमान असतो. कारगिल विजय दिवसाच्या दिनानिमित्त हे तरुण तेथे जाऊन सैनिकांना आदरांजली वाहिली.

## पंढरपुरात शिवसेनेकडून उपमुख्यमंत्र्यांचे भव्य स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : संत शिरोमणी नामदेव महाराज वसंत जनाबाई यांच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त पंढरपूर येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना श्री नामदेव पुरस्कार देण्यात आला पंढरपुरात त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले.



संत नामदेव महाराज पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवसेना सोलापूर जिल्ह्याच्या वतीने सोलापूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश( नाना) यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौकात येथील शिवतीर्थावर विशेष सत्कार करण्यात आला. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या सत्काराला विनम्र पुणे स्वीकार केला. श्री महेश दादासाठी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

यावेळी उपस्थित सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख महेश नाना साठे, संजय बाबा कोकाटे, अनिताताई माळगे, प्रियंका परांडे, सोलापूर जिल्हा अमोल शिंदे, लक्ष्मी टाकळी ग्रामपंचायत सरपंच संजय साठे, चरणदा चौरे, महेश चिवटे, अमर पाटील, सचिन चव्हाण, विनोद पाटील, विश्वजीत भो सले, समाधान फाटे, संग्राम अभंगराव अनिता गवळी, शिवसेना पदाधिकारी व शिवसेना कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डोहोळे ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी शुद्धोधन जाधव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा नजीकच्या डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी शुद्धोधन अशोक जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. उपसरपंच दिनेश ठाकरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्या नंतर रिक्त असलेल्या उपसरपंच पदासाठी शुक्रवारी डोहोळे ग्रामपंचायत येथे निवडणूक घेण्यात आली. या



निवडणुकीत शुद्धोधन जाधव यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने पिठासीन अधिकारी तथा डोहळे ग्रामपंचायतच्या सरपंच सुमन वाघे यांनी जाधव यांची उपसरपंच पदी नियुक्ती जाहीर केली. शुद्धोधन जाधव यांची उपसरपंच म्हणून नियुक्ती होताच कार्यकर्त्यांनी फटाके फोडत व ढोल ताशाच्या गजरात आनंद व्यक्त केला. याप्रसंगी पडघा परिसरातील तसेच भिवंडी, शहापूर , कल्याण परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, पक्षाच्या विविध पदाधिकाऱ्यांनी, संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी शुद्धोधन जाधव यांना शुभेच्छा दिल्या. गावातील नागरिकांनी व ग्राम पंचायत सदस्यांनी आपल्यावर सोपवलेली जबाबदारी आपण निश्चितच पार पाडणार असून गावातील विकासासाठी सदैव प्रयत्नशील राहणार आहोत अशी प्रतिक्रिया उपसरपंच शुद्धोधन जाधव यांनी व्यक्त केली आहे.




## एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलमध्ये कारगिल योद्ध्यांना विद्यार्थ्यांकडून मानवंदना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाखरी/पंढरपूर : एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल वाखरी, पंढरपूर येथे कारगिल विजय दिवस विद्यार्थ्यांकडून विविध सादरीकरणांने आणि संचलनाद्वारे शहिदांना मानवंदना देत उत्साहात साजरा करण्यात आला. कारगिल युद्धात भारतीय सैन्याने दाखवलेल्या अद्वितीय शौर्याचा स्मरणार्थ दरवर्षी हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचे स्मरण करताना शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेमाची भावना वृद्धिंगत झाली.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थी संचलनाने झाली, विद्यार्थ्यांनी कारगिल युद्धामध्ये शहीद झालेल्या सर्व हुतात्म्यांना संचलन करत मानवंदना दिली. त्यानंतर देशभक्तीपर गीते व नृत्य विद्यार्थ्यांकडून सादर करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य शिवाजी गवळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भारतीय सैन्याचे शौर्य, देशप्रेम आणि त्यांनी दिलेल्या बलिदानाचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी शिक्षक आर. बी. भट्टाचार्य सरांनी कारगिल युद्धातील 'ऑपरेशन विजय'चे चित्तथरारक वर्णन करत युद्धातील भारतीय सैन्याचा पराक्रम विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर उभा केला. यावेळी शिक्षिका सुप्रिया कोळी यांनी सादर केलेल्या देशभक्तिपर गीताने उपस्थितांना भारावून टाकले.

एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूल वाखरी येथे साजरा झालेला कारगिल विजय दिवस विद्यार्थ्यांच्या मनात देशप्रेमाची नवी चेतना निर्माण करणारा ठरला. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी भारत माता की जय अशा घोषणा देत संपूर्ण परिसर दुमदुमून टाकला. विद्यालयाचे प्राचार्य, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणांद्वारे कारगिलच्या शूर वीरांना मानवंदना अर्पण केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रियांका बांदल, विशाल विभुते, विकी घनमंडे, वैष्णवी हजारी, ओंकार थोरवे यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### ३६ पैकी फक्त १४ ठिकाणी पडताळणी अध्यक्ष
### मुख्यमंत्र्यांनी घेतली गंभीर दखल

## मराठा एसईबीसी ओबीसी कुणबी जात प्रमाणपत्र प्राप्त पडताळणी साठी मुदतवाढ द्या : राजेंद्र दाते पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : विविध अभ्यासक्रमात असलेल्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्र व इतर शिक्षणाचा लाभ घेताना एसईबीसी, कुणबी व ओबीसी जात प्रमाणपत्र पडताळणी-व्हॅलिडीटी बाबत सहा महिने मुदत वाढ मिळण्याचे आदेश जनहितार्थ होणे आवश्यक असुन किमान सहा महिने जात पडताळणी साठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे लेखी केली असता विषयाचे गांभीर्य पहाता ही बाब त्यांनी तत्काळ इतर मागास विभागाचे सचिवांकडे पुढील कारवाई साठी पाठवली असल्याची माहिती दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मेल द्वारे डॉ राजेंद्र दाते पाटील यांना कळवले आहे.





आपल्या सविस्तर निवेदनात जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले की,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय संकीर्ण-दि.२२ जुलै २०२४ चा संदर्भ दिला असुन सध्या शैक्षणिक प्रवेश सुरु असून एस इ बी सी,कुणबी मराठा व विविध जात प्रवर्गाचे प्रवेशात जातवैधता प्रमाणपत्र बंधन कारक असुन एस ई बी सी ओबीसी कुणबी जात प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्र शिक्षणाचा लाभ घेताना एसईबीसी विद्यार्थ्या प्रमाणे एस इ बी सी,कुणबी व ओबीसी जात प्रमाणपत्र पडताळणी साठी व व्हॅलिडीटी बाबत सहा महिने मुदत वाढ मिळण्याचे आदेश होणे अत्यंत गरजेचे असुन अत्यंत कठीण स्थिती निर्माण झाली असुन जात पडताळणी नसेल तर प्रवेशाची फक्त नोंद होते परंतु महाविद्यालय प्रवेश अंतिम करीत नाही म्हणुन सदरच्या अडचणी सोडवण्यासाठी अतीतात्काळ तातडीने जात पडताळणी मुदतवाढीचे आदेश होणे सुद्धा गरजेचे आहे.

जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी या पूर्वीच शासनास निवेदनात नमुद केलेले होते की, महाराष्ट्र राज्यात जात वैधता पडताळणी समित्यां बाबत विचार करता एकुण ३६ पैकी १४ ठिकाणी अध्यक्ष असुन उर्वरित ठिकाणी प्रभारी अध्यक्ष आहेत. याचा परीणाम शासकीय यंत्रणेवर होत आहे आणि परिणामतः जातवैधता प्रमाण पत्रे विहीत वेळेत उपलब्ध होत नाही त्या मुळे राज्यभरातील सध्याच्या प्रवेश प्रक्रियेत एसईबीसी प्रमाणेच ओबीसी (कुणबी) व इतर विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाण पत्रा साठी अर्ज केलेल्या पोहोच पावती फक्त प्रवेशाच्या अंतिम तारखे पर्यंतच मान्यता गृहीत धरण्यात येते परंतु अंतिम दिनांक पर्यंत म्हणजे कट ऑफ डेट रोजी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश आपो आप रद्द होतो ही गंभीर बाब त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्षात आणून दिली असून यामुळे असंख्य विद्यार्थी आरक्षण व सवलतीच्या लाभा पासून वंचित राहत असुन यावर गांभीर्याने निर्णय होणे गरजेचे आहे.

म्हणून डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी शासनास विनंती केलेली आहे की, शासन निर्णय संकीर्ण - २०२४क्र.७५/ आरक्षण ५ दि. २२जुलै २०२४ या निर्णयामध्ये आणि त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमीत आदेशात अशःत बदल तथा सुधारणा करुन एसईबीसी, ओबीसी, (मराठा कुणबी) व इतर सर्व प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शैक्षणीक नुकसान टाळण्या साठी जात प्रमाण पत्र वैधता प्रमाणपत्र प्राप्त करणे आणि ते विहीत वेळेत निर्गमीत होणे साठी जात पडताळणी साठी सहा महिने मुदत वाढ द्यावी आणि तशा स्पष्ट लेखी सूचना संबंधित विद्यापीठ, शिक्षण संस्था,महाविद्यालये,प्रवेश सेल एम एच सी ई टी व इतर सेल यांना तात्काळ देण्याचे आदेश व्हावेत व ते सर्व बदल व आदेश संकेतस्थळावर लोड करून समस्त विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अशी मागणी जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कडे लेखी केली असता विषयाचे गांभीर्य पहाता ही बाब त्यांनी तत्काळ इतर मागास विभागाचे सचिवांकडे पुढील कारवाई साठी पाठवली आहे.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# श्री विठ्ठल कारखान्याचे मिल रोलरचे पुजन

## आमदार अभिजीत आबा पाटील यांच्यासह संचालक मंडळाची उपस्थिती; १५ ते २० लाख मे. टन गाळपाचे उद्दिष्ट्य





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर वेणुनगर : दि. २५ जुलै रोजी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना लि., वेणून-गर या कारखान्याचा २०२५-२६ हंगामातील मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम कारखान्याच्या व्हाईस चेअरमन सौ. प्रेमलता रोगे, संचालक कालिदास साळुंखे, सिताराम गवळी व विठ्ठल रणदिवे, यांचे शुभहस्ते व कारखान्याचे चेअरमन, आमदार श्री अभिजीत (आबा) पाटील यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी बोलताना कारखान्याचे चेअरमन, आमदार अभिजीत आबा पाटील म्हणाले की, सर्व सभासदांनी विद्यमान संचालकावर विश्वास ठेवून कारखान्याची सुत्रे आमच्याकडे सोपविलेली आहेत. तेंव्हापासून ज्या ज्या वेळी आ-पणास बोलल्याप्रमाणे दिलेली सर्व अभ्यासने पाळलेली असून, यापुढेही आपल्या विश्वातास तडा जावू देणार नाही. आपण पिकविलेल्या ऊसाची संपूर्ण नोंद देवून पुढील हंगामात आपले कारखान्याकडे ऊस गाळप-ास देवून सहकार्य करावे. मागील सन २०२४-२५ गळीत हंगामामध्ये गळीतास आलेल्या ऊसास प्र.मे.टन रु.२८०३/-याप्रमाणे ऊसाची बिले, तोडणी व वाहतुकदार यांची कमि शनराह सर्व बिले अदा केली आहेत, तसेच सेवानिवृत्त कर्मचारी व मयत कर्मचारी यांचे फायनल पेमेंट ठरल्याप्रमाणे अदा केलेले आहे. काम गारांची उर्वरीत थकीत देणी यावर तोडगा काढून टप्या टप्याने अदा करणेस संचालक मंडळ कटीबद्ध आहे. सभासदांचा अपघात विमा उतरविला असून त्याचा ही फायदा सभासदांचे वारसांना मिळून देत आ-होत, आपले कारखान्याचे दुर्दैवाने मयत झालेल्या पाच सभासदांच्या वारसांना विमा क्लेचा प्रत्येकी ५ लाख रुपयेचा चेक या प्रसंगी देणेत आला.

तसेच सन २०२५-२६ गळीत हंगामाचे नियोजन पूर्ण केलेले आहे. ऊस तोडणी वाहतूक ठेकेदारांना पहिला ॲडव्हान्स हप्ता अदा केलेला आहे व दुसरा हप्ता लवकरच अदा करीत आहोत. कारखान्याची ऑफ सिझनमधील दुरुस्ती व देखभालीचे कामे प्रगतीपथावर असून गळीत हंगामामध्ये कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ नयेत या दृष्टीने सर्व खातेप्रमुखांनी कामकाज करुन घ्यावे, अशा सूचना देऊन कारखाना वेळेवर चालू करणेसाठी प्रयत्नशील राह-ावे, तसेच येत्या २०२५-२६ गळीत हंगामात कमीत कमी १५ लाख ते २० लाख मे.टना पर्यंत गाळप करण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे ही त्यांनी यात्रसंगी सांगितले.

सदर कार्यक्रम प्रसंगी कारखान्याचे जेष्ठ संचालक दिनकर चव्हाण, सचिन पाटील, तुकाराम मरके सर, महादेव तळेकर सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन नितीन पवार ऊस पुरवठा अधिकारी यांनी केले.

सदर प्रसंगी कारखान्याचे संचालक सर्वश्री संभाजी भोसले, सुरेश भुसे, बाळासाहेब हाके, धनंजय काळे, साहेबराव नागणे, जनक भोसले, प्रविण कोळेकर, नवनाथ नाईकनवरे, दत्तात्रय नरसाळे, अशोक जाधव, सिध्देश्वर बंडगर, महेश खटके, तज्ञ संचालक दशरथ जाधव, अशोक तोंडले, निमंत्रीत संचालक धनाजी खरात, तानाजी बागल, उमेश मोरे, अंगद चिखलकर, अशोक घाडगे, गणेश ननवरे, कार्यकारी संचालक आर. बी. पाटील, जनरल मॅनेजर डी. आर. गायकवाड कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श समाजसेवक राष्ट्रीय पुरस्काराने कैलास गहिनीनाथ बनसोडे यांचा गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपळे गुरव, पुणे : समाजसे-वा म्हणजे केवळ शब्द नाही, ती एक जगण्याची दिशा आहे, याचे जिवंत उद-ाहरण ठरलेले कैलास गहिनीनाथ बनसोडे

### डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित



यांना ए. डी. फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम राष्ट्रीय पुरस्कार २०२५' 'आदर्श समाजसेवक' या श्रेणीत प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार एक गौरवच नव्हे, तर समाजसेवेतील त्यांच्या अथक, निस्वार्थ आणि प्रामाणिक कार्याची पावती आहे. गेली अनेक वर्षे बनसोडे सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून, गरीब, वंचित, निराधार, अपंग, आणि शिक्षणापासून वंचित घटकांसाठी त्यांनी विविध उपक्रम राबवले आहेत. त्यांच्या कार्यामुळे सम ाजाच्या विविध स्तरांवर सकारात्मक बदल घडवण्यात यश आले आहे.

डॉ. नितीन वाघमोडे (आयकर आयुक्त, पुणे), वैशाली मार्तंड चव्हाण (सहायक आयुक्त, पनवेल महानगरपालिका) आणि राम मांडूरके (सहायक पोलीस आयुक्त, पुणे) या मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुरस्कार समारंभ अत्यंत सन्माननीय, प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक वातावरणात पार पडला.

या वेळी उपस्थित मान्यवरांनी कैलास बनसोडे यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, समाजसेवा म्हणजे केवळ मदत नव्हे, ती संवेदनशीलतेची आणि जबाबदारीची शिकवण आहे. बनस-ोडे यांच्या कार्यातून तरुण पिढीने प्रेरणा घेतली पाहिजे.

पुरस्कार स्विकारताना कैलास बनस-ोडे म्हणाले, हा सन्मान माझ्यासाठी नाही, तर त्या प्रत्येक वंचित घटकासाठी आहे, ज्यांच्यासाठी आम्ही कार्य करतो. हा पुरस्कार ही माझी जबाबदारी अधिक वाढवणारा टप्पा आहे.

## ऐन पावसाळ्यात नागरिकांच्या नशिबी गटारगंगा

# पडघा बालाजीनगर मधील भूमिगत गटाराचे काम बोगस?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे/प्रतिनिधी



मुंबई नाशिक हायवे वर हाकेचा अंतरावर असलेल्या श्रीमंत समजली जाणारी पडघा ग्राम पंचायत परंतु पडघा ग्राम पंचायत परिसराची सध्याची अवस्था खूपच दैनिय पाहायला मिळत आहे.

ठेकेदारी म्हणजे मिळेल तिथे खाऊ अशी सध्या अवस्था आहे पडघा बालाजी नगर मध्ये मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढत आहे,बिल्डींग परवान्यांना ना हरकत दिली गेल्याने बिल्डर लॉबी मोठ्या प्रमाणात बांधकाम करताना कचरा व्यवस्थापन,सांडपाणी व्यवस्थापन याचा विचार न करता बिल्डींग बांधकामे केल्याने मोठ्या प्रमाणात सांडपाण्याचा समस्या उद्भवू लागल्या आहेत.

ग्राम पंचायत प्रशासन बिल्डर लॉबी वर याचे खापर फोडत असताना सदर ना हरकत मध्ये दिलेल्या अटी शर्तींचे चे उल्लंघन करणाऱ्या बिल्डर लॉबी वर कार्यवाही करताना मात्र दिसली नाही.

### बोगस ठेकेदारी पोसण्यात प्रशासन व्यस्त

पडघा न्यू बालाजी नगर मधील सांडपाणी व्यवस्थापना साठी भूमि गत गटारचे टेंडर काढून काम केले गेले परंतु हित संबंध जोपासण्याचा नादात ग्राम पंचायत सदस्य असलेल्यानच्या नातेवाईकांना सदर काम दिले गेले सदर ठेकेदाराने संपूर्ण रस्ता खोदून ठेवल्याने पावसाळ्यात बाल-ाजी नगर मधील अवस्था गटारगंगे सारखी झाली आहे पूर्ण रस्त्यात खड्डे असून आबालवृद्ध शाळे-तील मुलांना चिखलातून गुढगाभर पाण्यातून प्रवास करावा लागत आहे.

सदर ठेकेदाराने भूमिगत गटाराचे कामं करताना निकृष्ठ साहित्य वापरल्याने काम पूर्ण व्हायचा आधीच चेंबर वरील झाकणे फुटल्याने मोठ्या प्रम ाणात ये जा करणारी वाहने यात अडकून अपघात होत आहेत तसेच भविष्यात लहान मुले येणारी जाणारी वयोवृद्ध माणसे या उघड्या चेम्बर मध्ये पडून मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.परंतु संबधित ठेकेदार हा गरम पंचायत सदस्य यांचा नातेवाईक असल्याने ठेकेदाराने लोकांना गृहीत धरल्याचे पाहायला मिळत आहे.बालाजी नगर मधील लोकप्रतिनिधी लोकांकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांनी पडघा गरम पंचायत मध्ये जाऊन रोष व्यक्त करत संबंधित रस्त्याचा उघड्या चेम्बर च्या समस्या लवकरात लवकर सोडवण्य साठी निवेदन दिले आहे.संबंधित ठेकदार लोकांचा जीवाशी खेळत असल्याने केलेय कामाचे ओडीत करून ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करून ठेकेदाराचा परवाना रद्द करून कामाचा वितरीत केलेला निधी पुन्हा ठेकेदाराकडून शासना कडे वर्ग करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

# वाळू तस्कर एमपीडीए अंतर्गत येरवडा, कारागृहात स्थानबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर शहर हद्दीतील अवैद्यपणे वाळू उपसा करून ती बेकायदेशीर विक्री करणे धोकादायक व्यक्ती व सराईत गुन्हेगार पिल्लूया उर्फ नागनाथ गंगाधर बंद पट्टी रा-हणार महात्मा फुले चौक , संत पेठ पंढरपूर जिल्हा सोला-पूर. गंभीर शरीर विषयक गुन्हे दाखल असून अवैधरित्या वाळू, चोरी करणे विक्री करणे सोयीचे व्हावे म्हणून पंढरपूर शहर व शहर लगत असणाऱ्या भागांमध्ये दहशत मधून दमदाटी करणे अशा प्रकारच्या अनेक गुन्ह्याखाली त्याला गौण खजिना वाळू चोरी करणे भारतीय न्याय सहिता २०२३ प्रकरण सहा व १७ मधील अपराधी प्रकारची कृती असून सदरची कृती करण्यास त्याला सवय जडली होती. त्याच्याविरुद्ध गंभीर शरीराविषयी अनेक गुन्हे दाखल झाले होते. अटक करण्यात आली होती पण सदर तो होण्यात जामीन घेऊन शरद विषय गुन्हे ओवाळू तस्कर करणे हे तेजी चालूच होती. धोकादायक व वाळूतस्कर

### पंढरपूर शहर पोलीस स्टेशनची वाळू तस्करावर मोठी कारवाई

गुन्हेगार पिल्लूया उर्फ नागनाथ गंगाधर बंद पट्टे राहणार महात्मा फुले चौक पंढरपूर जिल्हा सोलापूर. याच्याविरुद्ध वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजीत घोडके यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी हातभट्टी औषध विषयक गुन्हेग-ार व धोकादायक व्यक्ती दृकश्राव्य विनापरवाना गुन्हे करणारी व्यक्ती अत्यावश्यक वस्तूचा काळाबाजार करणारी वस्ती व वाळूतस्कर याच्या वेळात कुरताना आळा घालण्या विषयी कायदा सन १९८१ मधील कलम तीन(१) अन्वये स्थान बद्ध



करण्याबाबत प्रस्ताव माननीय पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण यांच्या मार्फतीने माननीय जिल्हाधिकारी तथा न्यायदंडाधिकारी सो. सोलापूर यांना पाठवण्यात आला होता. त्या पद्धतीने स्थान पद्धतीचे कामकाज चाल-वून त्यां एम. पी .डी .ए .अंतर्गत स्थान पद्धतीचे आदेश पारित केल्याने स्थानबद्ध समाज ताब्यात घेऊन येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे, येथे एक वर्षाकरिता स्थानबद्ध करण्यात आलेले असून पंढरपूर शहरातील अनेक असे गुन्हेगार पर्वतीचे असणाऱ्या गुन्हेगारावर पशु मासल्या गुन्हेगावर कारवाई करण्याची सुरू आहे.

सदरची कामगिरी माननीय पोलीस अध-ीक्षक श्री अतुल कुलकर्णी सो, अप्पर पोलीस अध-ीक्षक श्री प्रीतम कुमार यावलकर सो, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री अर्जुन भोसले सो, व पोलीस निरीक्षक श्री संजय जगताप, पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजीत घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली गुणी प्रकटीकरण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री आशिष कांबळे, सहाय्यक पोलीस कल्याण ढवणे, पोलीस नाईक श्री सचिन इंगळे, पोलीस सहाय्यक राजेश गोस-ावी, पोलीस हवालदार शिवाजी पाटील, सिग्मा गोडसे, प्रसाद आवटी, सचिन हेंबाडे विठ्ठल विभूती, कपिल माने ,शहाजी मंडले, बजरंग बिचुकले, धनाजी मुटकुळे, दीपक नवले ,अमित शेख ,रतन जाधव, यांनी काम पाहिलेले आहे.

## जिल्हाधिकारी यांना प्रस्ताव सादर

# श्री विठ्ठल मंदिराच्या गळतीबाबत पुरातत्त्व विभागास पत्रव्यवहार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्धाराची कामे शासन निधीतून पुरातत्व विभागामार्फत दि.१६/१२/२०२३ पासून सुरू करण्यात आली आहेत. सदर कामाचे पर्यवेक्षण करून गुणवत्त-ापूर्ण कामे पुरातत्व विभागामार्फत करून घेण्यात येत आहेत.

तथापि, दिनांक २२ व २६ जुलै रोजी मंदिरात मुसळधार पाऊसाने गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पुरातत्व विभागास दि.२२ व २६ जुलै रोजी पत्रव्यवहार करून कळविण्यात आले आहे.



सदर जतन व संवर्धन काम ासंदर्भात मंदिर समितीच्या वेळोवेळी झालेल्या सभेमध्ये आढावा घेण्यात येत आहे व तशा सुचना पुरातत्व विभाग व कंत्राटदार यांना देण्यात आल्या आहेत. याशिवाय, यंदा पावसाळा लवकर सुरू झाल्याने वॉटरप्रुफींगची कामे वेळेत पूर्ण करता आली नाहीत, असे पुरा-तत्त्व विभागाने कळवले आहे. परंतु, गळती होऊ नये म्हणून आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात आलेल्या आ-हेत. आराखड्यातील सर्व कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण व्हा-वीत व आतापर्यंत झालेल्या कामाचे त्रयस्थ शासकीय संस्थेकडून ऑडीट करणेबाबत मा जिल्हाधिकारी सोलापूर यांना प्रस्ताव देण्यात आल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडियाचा ७६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : प्रजनन आरोग्य आणि कुटुंब कल्याण क्षेत्रात ४० शाखा व ५ प्रकल्पाच्या माध्यमातून देशाच्या १८ राज्यांमध्ये काम करणाऱ्या फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया या स्वयंसेवी संस्थेचा ७६ वा वर्धापन दिन फॅमिली प्लॅनिंगच्या सोलापूर शाखेत मोठ्या दिमाखात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून फॅमिली प्लॅनिंगचे माजी राष्ट्रीय उपाध्यक्ष व जीवन गौरव पुरस्कार विजेते प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर हे होते तर अध्यक्षस्थानी डॉ. राजीव प्रधान हे होते.




यावेळी एफ.पी.ए.आय. सोल-ापूर शाखेच्या वाटचालीत म ोलाचे योगदान दिले, संस्थेचा नावलौकिक वाढविलेले, फॅमिली प्लॅनिंगही सर्व सामान्यांची संस्था आहे अशी भावना तयार करण्यात मोलाचे योगदान दिलेल्या संस्थापक सचिव डॉ. भालचंद्र किणीकर, माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. जी. अहिरे, जेष्ठ उपाध्यक्ष डॉ. संपत बलदवा, रम णलाल सोनीमिंडे, कार्यकारणी सदस्या डॉ. गौरी कहाते, सदस्य संगमेश्वर रघ-ोजी, सिद्राम कोथली, युवा प्रतिनिधी साक्षी सर्वगोड, ऐश्वर्या सावंत, सोलापूर

### ज्येष्ठ सदस्यांकडून जुन्या आठवणींना उजाळा

जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण संस्थेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी कृष्णा सकट व कर्मचाऱ्यांचा सन्मानपत्र, शॉल व बुके देऊन डॉ. येळगावकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी ज्येष्ठ सदस्यांनी संस्थेच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला तर डॉ. गौरी कहाते यांनी अथर्व ज्ञानप-ीठ प्रतिष्ठान, कोल्हापूर यांच्याकडून गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधासाठी ९ ते १४ वयोगटातील ५० मुलींना मोफत एच.पी.व्ही. लस देण्यासाठी रू. ६२,५००/- च्या देणगीचा धनादेश सोलापूर शाखेचे चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांच्याकडे सुपूर्द केला.

डॉ. श्रीकांत येळेगावकर यांनी संस्थेत सुरू असलेल्या विविध प्रकल्पांविषयी व शाखेचे कार्यकारिणी मंडळ व कर्मचाऱ्यांच्या कार्यामुळे सोलापूर शाखेचे राष्ट्रीय स्तरा-वर नावलौकिक वाढल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी डॉ. राजीव प्रधान यांनी अध्यक्षीय समारोप केला. सोल-ापूर शहरातील विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व कर्मचारी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. एन. बी. तेली यांनी केले तर आभार डॉ. आयेशा रंगरेज यांनी मानले.